ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भविष्यातील शिक्षक – शिक्षणाकडून अपेक्षा

**प्रा.आवचर सीमा राघू**

## Abstract

*शिक्षण ही माणसाची मुलभूत गरज असून शिक्षण हे समाज प्रगतीचे व आर्थीक उन्नतीचे महत्वाचे साधन आहे. शिक्षणाचे Learning to know, Learning to be, Learning to do, Learning to live together असे चार आधारस्तंभ असून यावर आधारीत शिक्षक–शिक्षण असावे.. विदयार्थ्यांना घडविणारे शिक्षक प्रशिक्षणार्थीसुध्दा आज भरकटलेल्या अवस्थेत दिसतात. अशावेळी त्यांना स्थीर करणं, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणं, त्यांना 'स्व' ची जाणीव करुन देणे, परिस्थितीला सामोरे जायला शिकवणं ही आजच्या काळाची गरज आहे. कारण शिक्षक प्रशिक्षणार्थी हे भावी शिक्षक आहेत हे स्वत: जर संतुलित असतील तरच ते त्यांच्या विदयार्थ्यांचा विकास चांगल्या पध्दतीने करतील आणि म्हणूनच शिक्षक प्रशिक्षणात, शिक्षक–शिक्षणात जीवनकौशल्यावर भर देणे, भावनाधारित शिक्षण, ज्ञानरचनावादावर भर, शारीरिक शिक्षण, व्यायाम या घटकांचा आवर्जुन समावेश करावा जेणेकरुन सुसंस्कृत विद्यार्थी घडतील. पीढी घडेल.*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

### प्रस्तावना

राष्ट्राचा दर्जा लोकांना दिलेल्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो आणि शिक्षकाची गुणवत्ता शिक्षण प्रक्रियेतील शिक्षकाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते व शिक्षकाची गुणवत्ता शिक्षक–शिक्षण कार्यक्रमाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते आणि म्हणूनच शिक्षक–शिक्षण कार्यक्रम हा गुणवत्तापूर्ण असावा. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक, बौध्दिक पैलूंचा विकास करणारा असावा. या शिक्षक–शिक्षणामधून विद्यार्थी शिक्षकाचा सर्वांगीण विकास होऊन त्या विद्यार्थी शिक्षकाने पुढे जाऊन त्याच्या विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील रहावे आणि म्हणूनच आज शिक्षक–शिक्षणाकडे खूपच अपेक्षेने पाहिले जात आहे. शिक्षक–शिक्षण हा संपूर्ण शिक्षण पध्दतीचा कणा आहे. शिक्षण ही माणसाची मुलभूत गरज असून शिक्षण हे समाज प्रगतीचे व आर्थीक उन्नतीचे महत्वाचे साधन आहे. शिक्षणाचे Learning to know, Learning to be, Learning to do, Learning to live together असे चार आधारस्तंभ असून यावर आधारीत शिक्षक–शिक्षण असावे.

### व्याख्या

'निकोप मनात निकोप विचार करण्याची क्षमता म्हणजे शिक्षण होय.' – ॲरिस्टॉटल

सी.व्ही.गुडस् म्हणतात : शिक्षक प्रशिक्षणात सर्व अनुभव औपचारिक किंवा अनौपचारिक क्रिया समाविष्ट आहेत की, ज्या व्यक्तीला शिक्षण व्यवसायाची जबाबदारी सांभाळण्यासाठी आवश्यक असलेल्या योग्यता प्रदान करतात.

### शिक्षणाचे प्रकार

1.सेवापूर्व शिक्षक–शिक्षण म्हणजे शिक्षकी पेशामध्ये प्रवेश करतानाच प्रशिक्षणाची अट असल्याने ज्या व्यक्तीस शिक्षक म्हणून काम करावयाचे आहे त्या व्यक्तीस सामान्य शिक्षणानंतर पूर्ण करावे लागते.


2.एकदा शिक्षक सेवेमध्ये आल्यानंतर वेळोवळी शिक्षकाला आपल्या विषयातील ज्ञान, पध्दती, तंत्रे, कौशल्ये, साधने यामध्ये झालेले बदल व प्रगती यांचा परिचय करुन घ्यावा लागतो यास सेवांतर्गत शिक्षक–शिक्षण म्हणतात.

**भविष्यातील शिक्षक—शिक्षण खालीलप्रमाणे असावे.**

**1.जिवन कौशल्यांना प्राधान्य देणारे —**


"विद्यार्थ्यांना जीवन सकारात्मक दृष्टीकोनातून व यशस्वीपणे पार पाडता येण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्य विकसित करण्याचा सुकर मार्ग म्हणजे जीवन कौशल्यांचे शिक्षण होय."

विद्यार्थ्यांच्या क्षमता उच्चतम पातळीपर्यत पोहचविणे हे शिक्षणाचे एक उद्दिष्ट आहे. म्हणूनच जीवनकौशल्यांचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील दहा जीवन कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे महत्वाचे आहे.




**2.भावनिक बुध्दिमत्तेला/भावनाधारित शिक्षणाला महत्व देणारे**

1995 मध्ये डॅनियल गोलमनने भावनिक बुध्दिमत्ता ही संकल्पना मांडली. एखादयाला स्वत:च्या आणि इतरांच्या भावनांची देखरेख करणे आणि त्यांचे नियंत्रण करण्यास सक्षम बनविणे, आपले विचार व कृती यांना मार्गदर्शन करण्यासाठी भावनांचा उपयोग करणे म्हणजे भावनिक बुध्दिमत्ता होय.





विद्यार्थ्यांना स्वत:चा आत्मपरिचय, स्वत:च्या भावना, अभिरुची, बलस्थाने यांची जाणीव शिक्षक शिक्षणातून व्हावी. स्वत:च्या विघातक भावना, भावनिक उद्रेक यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आत्मनियंत्रण आवश्यक बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे आणि सतत उपक्रमशील असणे या क्षमतांचा सामवेश आत्मनियंत्रणात होतो. ध्येयसिध्दीसाठी स्वत:च्या भावनांना मार्गी लावणे. ध्येयप्राप्तीसाठी सतत प्रयत्नशील राहणे, आशावादी दृष्टीकोन, प्रयत्नशीलता हे गुण या व्यक्तीकडे असतात. इतरांच्या गरजा, भावना, चिंता यांचा विचार करणे, इतरांच्या मर्यादा व क्षमतांची त्यांच्या भूमीकेतून जाणीव होणे, मार्गदर्शन करणे, व्यक्तीभिन्नतेची जाणीव ठेवणे, सुसंवाद साधता येणे म्हणजे

तद्नुभूती होय. सामाजिक क्षमता किंवा कौशल्य म्हणजे सामाजिक संबंध सलोखा राखणे होय. हे सर्व भविष्यातील शिक्षक—शिक्षणातून साध्य व्हावे.

**3.ज्ञानरचनावादावर आधारित शिक्षण**

ज्ञानरचनावाद ही संकल्पना अध्ययनार्थी स्वत:साठी वैयक्तिकरीत्या किंवा सामूहीकरित्या ज्ञानाची निर्मिती करत असते. यामध्ये अध्ययन करत असताना परिस्थितीय अनुभवांना महत्व दिले जाते.

**शिक्षणातील ज्ञानरचनावादी दृष्टीकोन**




ज्ञानरचनावादी अध्ययनार्थ्यास बहुसांस्कृतिक जाणीव असावी. आपण का शिकायचे? कोणत्या माध्यमातून शिकायचे? याची जाणीव असावी. अध्ययनार्थी अध्ययन केंद्रित अध्ययन अशी परिस्थिती शिक्षक—शिक्षणात निर्माण करावी.

**4.व्यायाम/शारीरिक शिक्षणाला महत्व देणारे**

Sound mind in Sound body निरोगी शरीरात निरोगी मन वास्तव्य करत असते. त्यामुळे शिक्षक—शिक्षणात शारीरिक शिक्षणाला, व्यायामाला महत्व दयावे. योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा, सूर्यनमस्कार या गोष्टींना शिक्षक—शिक्षणात प्राधान्य दयावे.

विदयार्थ्यांना कृतीतून जास्तीत जास्त अनुभव दयावेत. जेणेकरुन विदयार्थी अनुभवसमृध्द होतील व त्यातून ते जीवन जगण्यास समर्थ बनतील. शारीरिक शिक्षणामुळे विदयार्थी सदृढ बनतील. शरीर व मन उत्तम असेल तर विदयार्थी कोणत्याही, कसल्याही परिस्थितीत टिकू शकतात व त्यासाठीच शिक्षक—शिक्षणात व्यायाम व वर सांगितलेल्या गाष्टींचा समावेश असेल तर उत्तम जीवन जगण्यासाठी विदयार्थी तयार असतील आणि म्हणूनच शारीरिक शिक्षण व कृतियुक्त शिक्षण शिक्षक—शिक्षणात समाविष्ट करावे.

**समारोप**

आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकजण बौध्दिक स्पर्धेला महत्व देताना आपण पाहतो. समाजात गुन्हेगारी, खूण, आत्महत्या, दरोडे यांचे प्रमाण वाढत असताना आपल्याला दिसतात. आजचा विदयार्थी मग तो प्राथमिक, माध्यमिक, महाविदयालयीन, विदयापीठीय कोणत्याही स्तराचा असू दया. थोडयाशा अपयशानेही ते खचून जाताना पहायला मिळतात. सतत ताणतणाव, अपयश, वाढती स्पर्धा यामुळे आजचा विदयार्थी स्पर्धेत टिकेल की नाही याची खात्री देता येत नाही. विदयार्थ्यांना घडविणारे शिक्षक प्रशिक्षणार्थीसुध्दा आज भरकटलेल्या अवस्थेत दिसतात. अशावेळी त्यांना स्थीर करणं, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणं, त्यांना 'स्व' ची जाणीव करुन देणे, परिस्थितीला सामोरे जायला शिकवणं ही आजच्या काळाची गरज आहे. कारण शिक्षक प्रशिक्षणार्थी हे भावी शिक्षक आहेत हे स्वत: जर संतुलित असतील तरच ते त्यांच्या विदयार्थ्याचा विकास चांगल्या पध्दतीने करतील आणि म्हणूनच शिक्षक प्रशिक्षणात, शिक्षक—शिक्षणात जीवनकौशल्यावर भर देणे, भावनाधारित शिक्षण, ज्ञानरचनावादावर भर, शारीरिक शिक्षण, व्यायाम या घटकांचा आवर्जुन समावेश करावा जेणेकरुन सुसंस्कृत विद्यार्थी घडतील. पीढी घडेल.

**संदर्भ**

*पारसनीस, न. रा. (2005). शिक्षकाचे प्रशिक्षण, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.*
*बिचुकले, भाग्यश्री. आणि सांगळे, अनुराधा. (2011). शिक्षकांचे शिक्षण, पुणे : सृष्टी प्रकाशन.*
*जगताप, ह. ना. (2007). शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.*
*सप्रे, निलिमा. आणि पाटील, प्रिती. (2007). शिक्षणातील विचारप्रवाह, काल्हापूर : फडके प्रकाशन.*
*सांगोलकर, अरुण. (2011). नवीन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह, नाशिक : इनसाईट पब्लिकेशन.*
*मोरे, लता. (2010). शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान, नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.*
*नागतोडे, किरण. (2006). शालेय व्यवस्थापन शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचार प्रवाह.*